**नियमित दिवाणी दावा क्र.१४३/२०१९ वरील निशाणी ६७ खालील आदेश**

(राजू उत्तम लोकरे वि. उत्तम केरु लोकरे व इतर)

(CNR No.MHSO-1900-1423-2019)

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.३ व ६ यांनी त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

**०२.** अर्ज, दावा व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले.

**०३.** प्रतिवादी यांनी असे कथन केले की, प्रतिवादी क्र.४ व ५ विरुद्ध वादीने ठाणे येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांच्याकडे रे.मु.नं.४४६/२०२० हा जाहिर होण्यासाठी व निरंतर ताकिदीसाठी दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.२ कडून दि.२७/०९/२०१८ रोजी वादी यांनी ठाणे येथील जागेचे खरेदीखत लिहून घेतल्याचे निदर्शनास आले. ठाणे येथील मिळकत प्रस्तुत दाव्यामध्ये समाविष्ट केलेली नाही. त्यामुळे उपरोक्त नमुद खरेदीखताच्या संदर्भाने लेखी कैफियतीमध्ये दुरुस्ती करणे गरजेचे आहे. त्यामुळे दुरुस्ती अर्ज मंजूर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

**०४.** निशाणी क्र.७१ वर वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, प्रस्तुतचा अर्ज दाव्याचे काम लांबविण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीचा सरतपास होवून सुमारे एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. प्रतिवादी उलटतपास घेण्याचे सोडून विविध कारणास्तव दाव्याचे काम लांबवित आहेत. वादीने स्वकष्टातून मिळविलेल्या पैशातून दि.२७/०९/२०१८ रोजी प्रतिवादी क्र.२ कडून जागा खरेदी केली होती. सदर मिळकतीचा प्रस्तुत दाव्याशी कोणताही संबंध नाही. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**०५.** प्रतिवादी व वादी यांचे कथनाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा सरसनिरसमानाने वाटप करुन स्वतंत्र ताबा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादीच्या लेखी कैफियतीचे अवलोकन केले असता वादीने ठाणे येथे एकत्र कुटुंबाच्या मिळकतीतून जागा खरेदी केली असे कुठेही कथन केलेले नाही. प्रस्तुत अर्जामध्ये देखील ठाणे येथील जागा वादी व प्रतिवादी यांची एकत्रीत कुटुंबाची मिळकत होती किंवा कसे याबाबत काहीही कथन केले नाही. त्यामुळे ठाणे येथील वादीची जागा या दाव्यामध्ये सामाविष्ट केली नाही याकारणास्तव प्रतिवादी यांना लेखी कैफियत दुरुस्त करण्याचा कोणताही अधिकार मिळत नाही. याठिकाणी प्रतिवादी यांनी वादीची ठाणे

येथील जागा स्वकष्टार्जित नसून एकत्र कुटूंबाची मिळकत आहे असे कथन केलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी मागणी केलेली प्रस्तावित दुरुस्ती प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली काढण्याकरीता गरजेची दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो ;

**आदेश**

निशाणी क्र.६७ वरील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

SANTOSH VISHNU MUNDE

Digitally signed by SANTOSH VISHNU MUNDE
Date: 2026.03.20 16:26:56 +0530

दि.१३/०३/२०२६

**(एस. व्ही. मुंडे)**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मोहोळ.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file of Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer - III | : | Sapana A. Madgundi |
| Court | : | Jt.C.J.J.D., Court No. 2, Mohol |
| Date | : | 13/03/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer | : | 13/03/2026 |
| Judgment Uploaded on | : | 20/03/2026 |